म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा०वी०
ग्र क्र. ११७६५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
११७६५

IRBK-0111765



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# शुक भाष्य

## आणि

## इतर कथा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

११७६५

**मेघदूत प्रकाशन**

( आबाल-वृद्धांना आवडणाऱ्या कथा )

IRBK-0111765

सौ. गुलाब जोशी
( जस्टिस ऑफ पीस )

किंमत ६० पैसे

मुद्रक :
सौ. गुलाब जोशी, जे. पी.
मेघदूत प्रिंटर्स, माहीम-मुंबई १६.

प्रकाशिका :
सौ. गुलाब जोशी, जे. पी.
सीता सदन, ब्लॉक नं. ३,
तुळशीपाईप रोड, दादर,
मुंबई २८.

प्रथमावृत्ति – एप्रिल १९६६.


सर्वाधिकार प्रकाशिकेच्या स्वाधीन.



3309

# शुक भाष्य





गोष्ट अगदीं आधुनिक काळांतील आहे. परंतु गोष्टींतील पशु आणि पक्षी मात्र फार फार वर्षांपूर्वींची म्हणजे ज्यावेळी ही पृथ्वी निर्माण झाली त्या काळांतील आद्य पशु पक्षी आहेत. शुक नांवाचा पोपट आणि त्याची पत्नी शुक्रा; कपिध्वज नांवाचा वानर नि त्याची पत्नी मर्कटी; रसिक नांवाचा हरीण आणि त्याची बायको लज्जावती; पशुमित्र नांवाचा कोल्हा आणि त्याची पत्नी भालु; चतुर नांवाचा ससा आणि त्याची पत्नी चातुरी अशी त्या पात्रांची नांवे होत.

पृथ्वीतलावर जन्म घेतल्या पासून ही मंडळी अगदीं एकोप्यानें नांदतात. कधीं कोणाशी भांडण नाहीं कीं मारामारी नाही. लक्षावधि वर्षे लोटली तरी त्यांची मैत्री कायम आहे. त्यांच्या मैत्रींत जराहीं वैगुण्य नाहीं.

मानवामध्यें जसें सप्त–चिरंजीव आहेत आणि ते अमर आहेत तशीच ही मंडळीहि अमर आहेत. ह्या पुरातन मंडळींना मानवी वाणी आहे. मनुष्य जातिप्रमाणें ही मंडळी एकमेकांशी बोलूं शकतात, विचार विनिमय करूं शकतात. ह्या मंडळीमध्यें आकाशांत भरारी मारणारा असा एकच पक्षी म्हणजे शुक नांवाचा पोपट आणि त्याची पत्नी शुक्रा. आपल्या पृथ्वीतलावर काय काय चाललें आहे हे जाणून घेण्याची उत्कंठा निर्माण झाली कीं पृथ्वी–पर्यटनासाठीं ह्या पतिपत्नींची निवड केली जाते.

एकदां अशीच कामगिरी शुक आणि शुक्राच्या वाट्याला आली. सर्व मंडळीचा प्रेमानें निरोप घेऊन त्यांनी आकाशांत उड्डाण केले. पर्वतामागून पर्वत, समुद्रामागून समुद्र पार करीत अनेक दिवसांच्या प्रवासानंतर हे दोघे एकदांचे मनुष्य वस्तींत पोचले. त्या वेळीं रात्रौ नऊचा सुमार असावा. विश्रांतिसाठीं त्यांनी एक झाड पसंत केले नि तेथेंच रात्र काढून पुढील प्रवासास निघण्याचा बेत केला. दोघांच्या गुज गोष्टी सुरूं झाल्या.

‘ प्रिये, ह्या पृथ्वीवर तर रात्रौ सुद्धां सूर्य उगवतो ! पहा जिकडे तिकडे कसा लखलखाट दिसत आहे.’

‘ सख्या, हें सारं अजब खरंच ! मला वाटतं ह्या भागांत देव रहात असावेत. ज्यानी हे जग निर्माण केले ते ! !

‘ असेल, तसेंहि असेल. पण मग येथें पशु आणि पक्षी कसें

नाहींत. शंकराचा तो नंदी; विष्णुचा तो गरूड; गणपतिचा तो उंदीर, हे सर्व प्राणी गेले तरी कोठें ?'

'सख्या कदाचित शंकर, विष्णु आणि गणपति कोठें तरी राक्षसांशी लढण्यासाठीं गेले असावेत. राक्षस नि देव म्हणजे अगदीं हाडवैरीच नाहींत काय ?'

'खरं आहे तुझं म्हणणं.' असें शुक पत्निला सांगत आहे तोंच दोन उंच पायांवर चालणारे, हातांत कांहींतरी असलेले व आपापसांत गप्पा मारणारे चार प्राणि त्यांच्याच झाडाच्या रोखानें येतांना त्यांना दिसले. पति-पत्नींना आनंद झाला. देवांची भेट होणार असें त्यांना वाटले. त्यांच्या पायांवर लोटांगण घालण्यासाठीं ति दोघे उत्सुक झाली. थोड्याच वेळांत ते चार प्राणि त्या झाडाखाली आले. त्यापैकीं एक दुसऱ्याला म्हणाला,

'दोस्त, आज इंदिराजींची पंतप्रधान म्हणून निवड झाली...'

शुक आणि शुक्रा झाडाच्या उंच फांदीवर बसल्यामुळें त्या माणसाने इंदिराजींचा जो उल्लेख केला तो 'इंद्र' असा त्यांना ऐकूं गेला. शुकाला फारच धन्यता वाटली. आपण इंद्रपूरींत आलो ह्याची त्याला खात्री पटली. तो घाइघाईनें म्हणाला,

'प्रिये, किती मोठें आपले भाग्य! आपण इंद्रपूरींतच उतरलो आहोंत. पहा ते देव इंद्राच्याच गोष्टी बोलत आहेत.'

'सख्या ऐक रे जरा! मलाहि ते समजले. देवांची वाणी नीट लक्षपूर्वक ऐकावी, मधेंच बोलूं नये सख्या!!'

आपल्या पत्नीचें बोलणें शुकाला पटलें. तो कान टवकारून पुढील संवाद भक्तिपूर्वक ऐकूं लागला. झाडाच्या बुंध्याशी बसलेले देव बोलत होते—

'...आणि सगळे लोक आनंदांत दंग आहेत. आपल्या सारख्या निशाचरांना. ...'

देवांच्या तोंडचे निशाचर शब्द ऐकतांच शुकाच्या तोंडून एकदम उद्गार निघाले,

'सखे, अग ही इंद्रपूरी नाहीं हे शंकराचं तांडववन असावं. निशाचर म्हणजे भूतें. ही सर्व मंडळी शंकराचे गण नव्हेत कां?'

'हो रे प्रिया, पण शंकर म्हणजे सुद्धां देवच ना! उलट महादेवादि देव. ऐकूं द्या काय म्हणतात तें निशाचर.' देव पुढे बोलूं लागले,

'...हीच सुवर्ण संधि. आजच्या सारखी सुवर्णसंधि पुन्हां कधींहि प्राप्त होणार नाहीं. येथून चांदणी चौक कांहीं फारसा दूर नाहीं...'

'सख्या, तुझे दोन्ही अंदाज चुकले. अरे हे चंद्रदेवाचे गण आहेत. ऐकलस ना चांदणी चौकाचे, चंद्राच्या राणीदेवींचे निवासस्थानाचें नांव?' शुका म्हणाली.

'पण मला हे फारच अजब वाटत आहे. हे प्राणि कोण आहेत त्याचा कांहींच पत्ता लागत नाहीं. देव म्हणावें तर तोंडावर बुरखा घेण्याचें कारण काय? आणि राक्षस म्हणावें तर इतके ठेंगणे कसे? भूतें–निशाचर म्हणावी तर इतकी सुंदर कशी? सारंच अजब आहे. ब्रह्मदेवानें ही कांहीतरी वेगळीच सृष्टि निर्माण केली आहे असं वाटतं. थांब आतां आपण त्यांचे सर्व बोलणे नीट ऐकूं या त्या शिवाय हे कोडें कांहीं सुटणार नाही.'

देव पुढें बोलूं लागले,

'चांदणी चौकांत जशा चांदण्या आहेत तसेंच धनिकही आहेत. आजच्या ह्या आनंदी वातावरणांत हा सारा धनिक वर्ग चैन करण्या-

साठीं गेला असेल. बोलतां बोलतां चार दोन लाख सहज मिळूं शकतील.'

'तूं म्हणजे नांवाप्रमाणेंच दगड आहेस झालं. दगडू नांव ठेवण्यांत आईबापांची हुशारीच दिसून येते हे मात्र खरें. अरे हे धनिक म्हणजे मोठें लबाड. त्यांच्या तिजोरींत का पैसा सांपडेल? आपल्या सारख्या दरोडेखोरांनी नाहीं डल्ला मारला तरी ते कां सरकारच्या हातून सुटणार आहेत. काळाबाजाराचा पैसा तिजोरींत ठेवण्यासारखा गाढवपणा ही मंडळी करणार नाहींत. आपल्या पेक्षां सरकारी दरोडेखोरांची त्यांना जास्त भीति आहे.'

'कसं अगदीं मनासारखं बोललास. सोन्या, काळाबाजाराचा पैसा म्हण सरकार ताब्यांत घेते ही तर शुद्ध दरोडेखोरगिरीच नाहीं का.' धोंड्यानें आपली अकल पाजळली.

'अरे, शुद्ध म्हणजे काय? अगदीं बावनकशी सोन्यासारखी शुद्ध. ह्या काळ्याबाजारवाल्यांना राजरोस लोकांना लुटूं द्यायचं, अगदीं डोळ्या देखत. पण डोळे नाहींत असं दाखवावयाचं. नि हे धनपति—काळाबाजारवाले जी लूट मिळवितात तिच्यावर डल्ला मारावयाचा.' सोन्यानें आपले मत मांडल त्यावर ह्या सर्व मंडळींत जोराचा हंशा पिकला.

'शाब्बास सोन्या! अरे लेका पण खरी मजा पुढेंच आहे. हे काळाबाजारवाले गोरगरीबांकडून दामदुपटीनें जी लूट आणतात ती लूट मग सरकारी तिजोरींत जमा होते. त्याचा कांहीं भाग कदाचित.. कदाचित कशाला बहूतेक आपापसांत लुटारू मंडळी वाटून घेत असावीत. आणि अखेर मजा अशी कीं ह्या पैकीं कोणत्याच लुटारूला मात्र शिक्षा नाहीं.' छगननें आपले मत प्रदर्शित केलें.

*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*-*

'अरे जाऊं द्या, जाऊं द्या तो आपला विषय नाहीं. उद्याच्या बेताचे पक्के करूं या पाहूं. असं करूं या मी होतो पारधी. माझ्याजवळ पोपट आहेच. तो मोठा बोलका पण आहे...'

पोपटाचें आणि तेही बोलणाऱ्या पोपटाचें नांव ऐकतांच इतका वेळ स्वस्थ चित्तानें ऐकणाऱ्या शुक जोडप्याची गाळण उडाली. शुक आपल्या पत्नीला म्हणाला,

'प्रिये, आपण जरी अमर असलों तरी हे दांडगेश्वर आपणाला पकडून ठेवतील नि मग आपल्या सर्व मित्रांना आपण कधींच भेटूं शकणार नाहीं. तर चल बघूं ह्या दुष्टांच्या पासून लगेच दूर जाऊं या!'

शुकाचें बोलणें त्याच्या पत्नीला पटलें आणि कीर्रर्र असा मोठ्यानें आवाज करून त्या जोडप्यानें उड्डाण केलें. झाडावर एकाएकीं झालेला फडफडाट ऐकून बुंध्याशीं बसलेले निशाचरहि गडबडले नि त्यानीहि धूम पळ काढला.

'सख्या, आपण पाहिले ते प्राणी कोण बरें असावेत, ना धड देव! ना राक्षस!'

'प्रिये परमेश्वराची लीला अगाध खरीं! ह्या सृष्टिचें आपण संपूर्ण निरीक्षण करूं या. अतिशय सावधगिरीनेंच आपण वागलें पाहिजे. ह्या क्रूर प्राण्यांच्या हातीं आपण पडतां कामा नये!'

'सख्या, त्या पहा कशा चांदण्या चमकत आहेत. वर आकाशांत चमकतात आणि खालीं ह्या पृथ्वीवरहि चमकतात! ही पृथ्वी म्हणजे अगदी अजब नगरीच वाटतें मला. पाहूं या तरी खाली उतरून!'

'प्रिये, चल अगदीं सावकाश खाली झेप घे.'

शुक आणि शुक्रा चांदण्यांच्या रोखानें खाली आली, चमकणाऱ्या चांदण्यापासून दूर अंतरावर एका झाडावर बसली, नि तेथून निरीक्षण करूं लागली. त्यांना काय दिसलें बरें! वनराज सिंहाच्या भयंकर गर्जना ऐकूं येऊं लागल्या; माकडांचे चित्कार, कुत्र्यांचे भुंकणे, घोड्यांचे खिंखाळणें असे अनेक पशुपक्षांचे आवाज ऐकूं येऊं लागले. कसला तरी टर्र्र्र घुम...टर्र्र्र...घुम घुम असा आवाज निघत होता. नि दोन उंच पायावर चालणारे अनेक प्राणी बाहेर इतस्ततः फिरत होते. इतक्यांत एका पिंजऱ्यांत घातलेलें एक माकड, त्याच्या पाठीमागे तशाच स्थितींत असलेला सिंह यांना दोन पायाचे प्राणि ओढून नेतांना दिसले. हे दृष्य पहातांच शुकाचे जोडपें पूर्ण हादरलें नि तेथून त्यांनीं पुन्हां उंच उड्डाण केलें. शुक म्हणाला,

‘प्रिये, परमेश्वराची ही सृष्टी महाभयंकर दिसते. नुसत्या गर्जनेनें सर्वांना भयभीत करणाऱ्या सिंहाला सुद्धां हे प्राणी पकडून ठेवतात. त्याला थोपटतात, त्याच्या अंगावर बसतात! अरे बापरे. मला वाटतें हे देवापेक्षांहि मोठे नि राक्षसांपेक्षांहि क्रूर असावेत. तरी आतां ह्या सृष्टिचे निरीक्षण लांबूनच केलेले बरें!! जवळ नको रे बाबा!!’

अशा तऱ्हेचा संवाद करीत ही दोघं नवरा बायको पृथ्वीतलावरील सर्व भागांतून फिरली, अनेक विचित्र गोष्टी पाहिल्या, आकाशांत तरंगत जाणारे कांहीं तरी (विमान) पाहिले, जमिनीवरून जलद्गतिनें अगदीं चित्त्यापेक्षांहि पुष्कळ जलद धांवणाऱ्या लांबच्या लांब नागिणी पाहिल्या आणि हे जोडपें आपल्या स्वस्थानीं परत गेलें.

सर्व मंडळी त्यांची आतुरतेनें वाट पहात होती. दोघांचे खाणे-

पिणें झाल्यावर गोष्टिनां सुरवात झाली.

शुक म्हणाला,

'अहो कपिध्वज, तुमच्या पुत्रपौत्रांची स्थिती मोठी केविलवाणी आहे. ह्या साता डोंगरांच्या पलिकडे जी सृष्टि आहे तेथें दोन पायावर चालणारें प्राणि रहातात. त्यांनी तुमच्या पुत्र पौत्रांना गुलाम बनविलें आहे. त्यांच्या कंबरेंत दोरी बांधून कोलांट्या उड्या मारणें त्यांच्या नशिबी आले आहे. जरा चुकलें कीं पाठींत दांडका हाणला जातो !'

'मित्रा, इतकें का माझे वंशज पुळचट आहेत. ज्या माझ्या वंशजांनी रावणासारख्या राक्षसाला लोळविला ते ह्या यत्किंचित प्राण्याला भितात ! साफ खोटं आहे तुझं म्हणणं !' कपिध्वज रागानें म्हणाला.

'मित्रा रागाऊं नकोस. ही गोष्ट सत्य आहे. ही झाली तुझ्या जातभाईंची कथा. आतां ह्या रसिकाच्या वंशजांची कथा ऐक, ह्याच्या जातभाईंचे कातडें काढले जाते नि मोठमोठे वेटोळे डोक्या-वर घेऊन फिरणारे व तोंडावर दातांच्या खालीं लव्हाळ्यांच्या मुळाप्रमाणें वाढणारे केस असणारे प्राणि त्या कातड्यावर बसतात. गळ्यांत कांहींतरी गोल गोल बांधतात नि ते गोल हातांनी सरसर ओढीत तोंडानें कांहींतरी बडबडतात. शिवाय ह्या प्राण्यांच्या अनेक घरांतून तुझे कातडे टांगलेले मी पाहिले आहे !'

'मित्रा, ज्या माझ्या जातभाईंवर देवांनी प्रेम केले त्या माझ्या वंशजांची अशी दुर्दशा करणारे हे प्राणी कोण ? थांब मीच त्यांना ह्याचा जाब विचारतो !!' रसिक आवेशांत ओरडला. त्यानें चार पायांना ताण देऊन उंच उंडी घेतली नि चौखूर उधळून तो सूड

घेण्याच्या पावित्र्यांत उभा राहिला. त्याचा हा आवेश पाहून शुक म्हणाला,

‘ मित्रा, तुझ्या ह्या वल्गना व्यर्थ आहेत. कल्पना कर कीं सिंह येथें जवळपास आला तर तूं काय करशील ? ’

‘ अरे मीच कशाला आपणां सर्वांना येथून पळून जावें लागेल.’

‘ खरं ना हे ! ’

‘ होय ! ’

‘ तर मग ऐक, त्या सिंहाच्या वंशजांनाहीं त्या प्राण्यांनी पकडून ठेवले आहे. आणि जर कां सिंह त्यांच्या हुकुमाप्रमाणें वागलें नाहींत तर त्यांना लाकडाला बांधलेल्या नागिणींच्या फटकाऱ्यानें झोडपून काढले जाते.’

‘ अरे बापरे, फारच भयंकर ! ! देवा तुला नाहीं कारे माझ्या वंशजांची दया येत ? ’

‘ मित्रा कसला देव देव करीत बसला आहेस. ह्या देव देवतांचीहि तिच स्थिति आहे. दगड रचून त्यांच्या आंत देवांना त्यांही कोंडून ठेवले आहे.’

‘ म्हणजे, देवांनीहि गडबड करूं नये म्हणून कीं काय ! ’

‘ अगदीं बरोबर, ठराविक वेळीं हे लुच्चे त्या दगडांच्या आंत जातात. कोंडून ठेवलेल्या देवापुढें भरपूर खाण्याचें पदार्थ ठेवतात. पण त्यापैकीं देवाला कांहीं मिळेल तर शपथ ! सर्व पदार्थ हेच प्राणी गट्ट करतात, देवाला फक्त आशा दाखवितात. म्हणतात कसें हें देवाधि देवा, मला खूप खूप जगूं दे, खूप खूप सुंदर बायको मिळूं दे, हुशार हुशार मुलं होऊं दे; अशा तऱ्हेचे अनेक प्रकारचें

वर हे प्राणि देवांकडून मागतात आणि त्याच्या बदली देवाला कोंबडे, बकरे बळी देतात!'

'शिव, शिव, काय ही देवांची विटंबना. ह्याचाच अर्थ असा कीं देव सुद्धां आपल्या वंशजांना ह्या प्राण्यांच्या तडाख्यांतून वाचवूं शकणार नाहींत!'

'अरे सोड, त्या प्राण्यांची भीति. माझं नांव आहे पशुमित्र. म्हणजे मी तुम्हां सर्वांचा मित्र. पहा तर खरं मी तुमची नि देवांचीहि ह्या प्राण्यांच्या तावडींतून सुटका करतो कीं नाहीं ते! काय बिशाद आहे माझ्या जातभाईंवर हल्ला करण्याची!!'

कोल्ह्याचे हे गर्वोक्तीपूर्ण उद्गार ऐकून शुक हसूं लागला. त्याला थांबवीत त्याची पत्नी शुक्रा कोल्ह्याला म्हणाली,

'भावोजी, एवढं मात्र खरं कीं तुमचा वंशज असा कोठेंच दिसला नाहीं. पण......'

'पण काय... सांग ना वहिनी लवकर.'

'पण......'

'पुन्हां पण... बोल, लवकर बोल.'

शुक्राच्या डोळ्यांत पाणी तरळत होतें. ती म्हणाली,

'तुझ्या वंशजांचा जवळ जवळ निर्वंशच झाला आहे. कालांतरानें तूं आणि तुझी पत्नि हेच ह्या पृथ्वीतलावर उराल!!'

'म्हणजे?'

'म्हणजे असं कीं तुला ह्या प्राण्यांच्या जगांत अतिशय लुच्चा नि भितरा म्हणून समजलें जातें. शिवाय ह्या प्राण्यांची अशी समजूत आहे कीं सकाळी उठल्याबरोबर तुझें तोंड पाहिलें तर त्यांचा दिवस सुखाचा जातो.'

'असं आहे तर ते माझ्या वंशजांना का बरं मारतात!'

'जातच तशी महा क्रूर! सकाळीं उठल्याबरोबर तुझं दर्शन घडणं कदापि शक्य नाहीं. म्हणून तर हा सर्व अनर्थ. तुझ्या वंशजांना ठार करावयाचं. त्यांची कातडी सोलून काढावयाची व त्या कातडींत पाला पाचोळा भरून तुझी मूर्ति करून घरांत ठेवायची. असं केलं कीं आपोआपच तुझं दर्शन त्यांना घडतं!!'

'अरे, हरामखोरानों.' पशुमित्र उसळून म्हणाला.

'अहो पण असें जागच्या जागेवर चुळबुळून काय होणार आहे?' त्याची बायको भाळू चटकन बोलून गेली. नवऱ्याचा भित्रा स्वभाव तिला माहीत होता.

'मग काय करूं! तूं सांगशील तर आत्तांच असा जातो नि घेतो त्या प्राण्यांचा समाचार!!'

'भावोजी, अहो भावोजी. पण तुमची शेपटी दोन पायांत कां घालता. जरा ताठ करा कीं.' लज्जावति त्याला खिजवीत म्हणाली.

'वहिनी पहा बरं मला चिडवूं नका. माझ्या अंगांत ताकद नसली तरी युक्तीनें मी आजपर्यंत तुम्हां सर्वांचा अनेक संकटांतून बचाव केला आहे!'

'केलास खरा पण कोठपर्यंत!! जो पर्यंत हा प्राणी दृष्टिस पडला नव्हता तो पर्यंतच. शुक आणि शुक्रा म्हणतात ते खरं असेल तर आपल्या वंशजांची धडगत नाहीं हेंच खरं!!' चतुरानें पशुमित्राला हिणविलें.

'अहो चतुरराव. तुमचे वंशज लहान व चपळ म्हणून कसें बसे टिकून आहेत. त्यांचे मांस ह्या प्राण्यना फार फार आवडते.

त्यासाठीं रात्रंदिवस जागून सुद्धां ते तुझ्या वंशजांची चंदी उडवतात ! !'

'अरे बापरे ! ते प्राणी मांस भक्षक आहेत ?' सशाच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला. चातुरीनें त्याच्या छातीवर डोकें ठेवले, नि कानानें वारा घातला आणि ती कांहींतरी बोलण्याच्या बेतांत होती इतक्यांत पशुमित्र एकदम ओरडला,

'मित्रा शुका, आजपर्यंत आम्हीं तुझी थोरवी गाइली, तुझ्या सांगण्यावर विश्वास ठेवला आणि आज तूं आम्हाला थापा ठोकून आमच्या वंशजांची बदनामी करीत आहेस. खरं सांग तूं जे सांगितलेस ते सर्व खरं की तुम्हीं दोघं मजा करण्यासाठीं कुठेंतरी दडी मारून आम्हांला थापा ठोकित आहां !'

'मित्रहो, लक्षावधि वर्षे लोटली. आपण एकमेकांशी प्रामाणिक पणाने वागत आहोंत. आजच असा विकल्प आपल्या मित्राच्या मनांत कां बरं निर्माण व्हावा !'

'सांगतो ऐक ! तूं सर्वांच्या गोष्टी सांगितल्यास पण तुझ्या जातभाईंची कां नाहीं सांगितलीस ?'

'असं होय ! तर ऐक.' शुक सांगू लागला.

'माझ्या जातभाईंचे मांस कांहीं ह्या लोकांना इतकेसे पसंत नाहीं. परंतु माझ्या वंशजांचा हिरवागार रंग, लालभडक चोंच नि मधूर आवाज त्यांना अतिशय प्रिय आहे.'

'अरे लबाडा, मी म्हणतो तें हेंच. अशीच कांहींतरी आपल्या वंशजांची तूं स्तुती करणार हे मला माहीतच होतं !' पशुमित्र गरजला.

'कोणाचंहि बोलणं पूर्ण ऐकल्याशिवाय मधेच बोलूं नये. मी

काय सांगत होतो... हं माझ्या वंशजांचा हा मधुर आवाज नि हिरवागार रंग त्यांच्या नाशाला कारणीभूत झाला आहे. जंगलांत कोठेंहि स्वस्थ चित्तानें बसण्याची त्यांना सोय नाहीं. हे दुष्ट प्राणी त्यांच्यामागे सारखे लागलेले असतात. त्यांना पकडतात. लहान लहान पिंजऱ्यांत कोंबतात, डांबून ठेवतात. अति हालअपेष्टा झाल्या कीं मग माझे जातभाई मृत्यूमुखी पडतात !'

'छे, छे. . फारच वाईट. मग आतां करावं तरी काय ? ह्या प्राण्यांचा कसा नायनाट करावा ? देवाला गाऱ्हाणें करावें तर त्यालाच हे प्राणी लांचलुचपत देतात म्हणें. चला आजची आपली सभा आपण बरखास्त करूं या ! उद्यां आपण ह्या बाबत पुन्हां विचार करूं.'

अपूर्ण

पुढील गोष्ट पुष्प नं. २ मध्यें प्रसिद्ध होईल.


## आबाल - वृद्धानों,

मेघदूत प्रकाशन आपणांला मार्मिक त्याचप्रमाणें खुसखुशीत कथा सांगणार आहे. अद्‌भुतरम्य नगरींतून सहल करतांना मनुष्य स्वभावाचें विविध दर्शन ह्या कथांत उमटलेलें आढळेल. मेघदूत प्रकाशनाचें प्रत्येक पुस्तक आपण वाचाच.

कथा-सूत्र कसें असावें ह्या बद्दल सूचना केल्यास आम्हांला अधिक आनंद होईल.

# काणभूति पिशाच्च वर्ष गुरुजी व्याडि आणि इंद्रदत्त यांच्या कथा.

शंकर–पार्वति यांचे संभाषण चोरून ऐकल्यामुळें
निरनिराळ्या योनिंत जन्म घ्यावा लागलेल्या
शापितांच्या व त्यांच्या उद्धाराच्या
मनोरंजक कथा वाचा......

कौसिंबी नांवाच्या नगरींत नंद नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या प्रधानाचें नांव वररुचि असें होतें. त्याची विंध्य पर्वतावर असलेल्या विंध्यवासिनी देवीवर श्रद्धा होती. देवीला प्रसन्न करावें ह्या हेतूनें वररुचीनें पर्वतावर तपश्चर्येला सुरवात केली. कांहीं दिवसांनीं देवी प्रसन्न होऊन वररुचिला म्हणाली,

'तुझ्या तपश्चर्येनें मी प्रसन्न झाले आहे. परंतु तूं जे काम मनांत धरून तपश्चर्या करीत आहेस त्याची फलश्रुति काणभूति नांवांचे एक पिशाच्च आहे त्याला भेटल्याशिवाय होणार नाहीं. ते पिशाच्च

घनदाट अरण्यांत रहात आहे.'

देवीची आज्ञा होताच वररुची काणभूतीच्या शोधार्थ निघाला. सिंह, वाघ, वानर वगैरे हिंस्र पशू अरण्यांत इतस्ततः वावरत होते. त्यांना न भितां तो काणभूतिच्या शोधार्थ अरण्यांत इतस्ततः भटकत होता. असा भटकत असतांना त्याला एक अति उंच आणि विस्तारलेला भला मोठा वृक्ष दिसला. त्या वृक्षाच्या फांद्या फांद्यांवर शेकडो पिशाचें बसली होती. नाना तऱ्हेचे भयचकित उद्गार तोंडांतून काढीत होती. झाडाच्या बुंध्याला टेकून एक महाभयंकर पिशाच्च बसला होता. त्याला पहातांच कोणाचीहि बोबडी वळावी इतका तो क्रूर दिसत होता.

वररुचीला हे भयानक दृष्य दिसतांच अरण्य सोडून राजधानींत परत पळून जावें असें वाटलें. पण तें क्षणभरच. त्याला देवीच्या आज्ञेची आठवण झाली. देवीची प्रार्थना करून भीत भीतच तो एकएक पाऊल त्या झाडाच्या दिशेनें टाकूं लागला. सर्वांग घामानें डबडबले होते. तो जसा त्या झाडाच्या जवळ जाऊं लागला तस तशीं ती पिशाच्चे आपली रूपें बदलून अधिक भयानक रूपें धारण करूं लागली. जणूं, वररुचिला जिवंत गिळून टाकण्यांसाठींच ती अधिर झाली आहेत असें त्याला वाटलें. पळून जावें तर देवीच्या आज्ञेचे उल्लंघन होते व पुढें जावें तर ही पिशाच्चे आपणांस गट्ट करणार असा पेंच त्याच्यापुढें उभा राहिला!

पुन्हां एकदां देवीचे नामस्मरण करून तो पुढें सरकूं लागला. तो जवळ आला असें पहातांच झाडाच्या बुंधाला टेकून बसलेला तो पिशाच्च उठून उभा राहिला. त्यानें आपले दोन्ही हात वर उचलण्यांस सुरवात केली. वररुचिला वाटलें कीं आपली आतां पूरी भरली. जवळ जवळ मूर्च्छा येण्याच्या बेतांतच त्याची स्थिती होती.

आणि काय आश्चर्य, त्या भयानक पिशाचानें दोन्हीं हातांनी अत्यंत नम्रतेनें त्याला नमस्कार केला व त्याच्या पायांवर लोटांगण घातले. विस्मय चकित झालेला वररुचि हे दृश्य एकाद्या पुतळ्या-प्रमाणें उभा राहून पहात होता तोंच त्या पिशाचानें त्याला नम्रता-पूर्वक जवळच्याच शिलेवर बसविले व म्हणाला,

'काय आज्ञा ?'

'तुमचा आदरसत्कार करण्याची पद्धत पाहून तुम्हीं पिशाच्च योनींत कसें आलात ? आपले नांव काय ?'

'माझें नांव काणभूति, मला ही दशा कशी प्राप्त झाली ते सांगतो. ऐका,

एकदां उज्जैनीच्या स्मशानांत मी गेलो होतो. महादेव आणि गौरी यांचा संवाद रंगात आला होता. तो ऐकत मी तेथेंच बाजूला उभा होतो. गौरी महादेवाला म्हणाली,

'आपला पुष्पदंत गेल्याला बरेच दिवस झाले. आपल्याजवळ तो पुन्हां केव्हां बरें येईल ?'

माझ्याकडे बोट दाखवीत महादेव म्हणाले,

'तो पहा समोर उभा आहे तो पिशाच्च ! हा पूर्वी कुबेराचा सेवक दक्ष होता. ह्यानें स्थूलशिरा नांवाच्या राक्षसाशीं मैत्री केली ते कुबेराला पसंत पडलें नाहीं. म्हणून कुबेरानें ह्याला शाप दिला कीं तूं पिशाच्च हो, आणि विंध्यारण्यांत जा. त्याचा भाऊ कुबेराच्या पायां पडला नि उःशाप देण्याबद्दल विनंती केली. कुबेरानें उःशाप दिला कीं 'महादेवाचा एक गण पुष्पदंत नामक होता. तो गौरीच्या शापामुळें मनुष्य झाला आहे. तो ह्या पिशाच्चाला महा-देवापासून ऐकलेली कथा सांगेल. आणि हा पिशाच्च हीच कथा

मनुष्य झालेल्या माल्यवान नांवाच्या गणास सांगेल. असें घडलें म्हणजे तिघेंही शापमुक्त होऊन परस्परांच्या स्थानीं जातील.'

महादेवानें कथन केलेली ही कथा ऐकून माझ्या आनंदाला सीमा उरली नाहीं. मी तसाच पळत पळत ह्या विंध्यारण्यांत येऊन पुष्पदंताची वाट पहात आहे.

काणभूतीनें सांगितलेली कथा ऐकतांच वररुची झोपेंतून खड-बडून जागा झालेल्या माणसासारखा दिसूं लागला. त्याला पूर्व जन्माची आठवण होऊं लागली नि एक एक प्रसंग डोळ्यासमोरून सरकूं लागला. तो काणभूतीला म्हणाला,

'अरे तोच मी पुष्पदंत. ज्याची तूं इतक्या उत्कंठतेनें वाट पहात आहेस! आतां माझा कथा ऐक,

'मला महादेवाचे दर्शन घेण्याची इच्छा झाली म्हणून मी मंदिरा-कडे गेलो तो महादेवाच्या नंदीनें माझी वाट अडविली. मला तो आंत जाऊं देईना. त्याच्या सामर्थ्याची मला कल्पना असल्यामुळें मी त्याचा प्रतिकार न करतां योगमार्गानें गुप्त झालों नि मंदिरांत प्रवेश केला. आंत जाऊन पहातों तों महादेव गौरीला विद्याधरांच्या अद्‌भुत कथा सांगत होते. त्या सर्व कथा मी चोरून ऐकल्या. पण माझ्या हातून एक मोठा प्रमाद घडला. ह्या सर्व कथा मी माझ्या पत्नीला सांगितल्या. माझी पत्नी जया ही गौरीची सखी होती. तिनें ह्याच कथा पुन्हां गौरीला सांगितल्या. ह्या सर्व कथा जरी गौरीला माहित होत्या तरी तशी जाणीव तिनें जयेला दिली नाहीं. तीला महादेवाचा मनस्वी राग आला. रागानें लाल होऊन ती महादेवाजवळ जाऊन म्हणाली,

'अहो महाराज, आपणांला सर्वजण देवाधिदेव म्हणतात आणि

असें देवाधिदेव सुद्धां खोटें बोलण्यांत पटाईत असतात हें पाहून मला आश्चर्य वाटत आहे ?'

गौरीच्या बोलण्याचा रोख लक्षांत न येऊन महादेव म्हणाले,

'गौरी, खोटं बोलण्याइतका मी भ्याड आहे असं कां तूं समजतेस ?'

'आपण भ्याड नाहीं, परंतु खोटं बोलण्यांत मात्र पटाईत आहांत !'

'खोटं ! आणि तें केव्हां बोललों ?'

'सांगते. लक्ष देऊन ऐका, तुम्हीं त्या दिवशीं मला सात विद्याधर कथा सांगितल्या आणि आश्वासन दिलेत कीं ह्या गुप्त कथा दुसऱ्या कुणालाही माहित नाहींत. सर्व प्रथम तुलाच त्या मी सांगितल्या आहेत !'

'अलबत् ! हे सर्व अक्षरशहा खरं आहे !'

'म्हणें खरं आहे !!' गौरी तोंड वेळावीत पुढे म्हणाली, 'अहो देवाधिदेव ह्या सर्व कथा जयेलाहि माहित आहेत. तिनेंच त्या सर्व कथा जशाच्या तशा मला कालच सांगितल्या.'

गौरीच्या तोंडून हा वृत्तांत ऐकतांच महादेवाला आश्चर्य वाटले. त्यानें अंतर्दृष्टी लावली आणि खरा प्रकार काय आहे तो जाणून घेतला व गौरीला हे कसें घडलें ह्याची सर्व हकीकत सांगितली. ती ऐकतांच गौरीचा राग अनावर झाला. तिनें तडकाफडकीं मला बोलवून घेतलें आणि शाप दिला, 'पुष्पदंता तूं नुसता उद्धटच नाहींस तर पतिपत्नींचा संवाद चोरून ऐकणारा महानीच आहेस म्हणून तुला मी शाप देतों कीं तूं आजपासून मनुष्ययोनींत जाशील.'

माझ्या जवळच माल्यावान नांवाचा एक दयाळू गण उभा होता.

त्यानें गौरीची प्रार्थना करून क्षमा याचना केली. परंतु गौरीच्या मनांत जराहि दया उत्पन्न न होतां उलट तिनें त्यालाच माझ्याच सारखा शाप दिला.

आम्हीं दोघांनी गौरीच्या पायांवर लोटांगण घातले. तिची प्रार्थना केली. जयेनेंहि देवीची विनवणी केली तेव्हां देवीनें उःशाप दिला कीं,

'माझा शाप निष्फल होणार नाहीं. तो तुम्हांला भोगावा लागणारच. ह्या शापमुक्तींतून तुम्हीं मुक्त व्हाल पण केव्हां! विंध्यारण्यांत काणभूति नांवाचे पिशाच्च इतस्ततः भटकत आहे. हा पिशाच्च पूर्वीं यक्ष होता. कुबेराच्या शापामुळें त्याला ही गती प्राप्त झाली आहे. जेव्हां तूं ह्या कथा काणभूतिला सांगशील तेव्हां तुझी शापांतून मुक्तता होईल. कालांतरानें काणभूति ह्या कथा माल्यवानास सांगेल आणि माल्यवान ह्या कथांचा प्रचार करील तेव्हां ते दोघेहि शापमुक्त होतील.'

अशी ही माझी हकीकत आहे. आतां ज्या दिव्य विद्याधर कथा चोरून ऐकल्यामुळें मला हे कष्ट भोगावें लागले त्या कथा तुला सांगतो.

# वररूचीची कथा

सोमदत्त उर्फ अग्निशिख ह्या नांवानें ओळखला जाणारा एक ब्राह्मण कौसिंबी नगरींत रहात होता. त्याच्या पत्नीचें नांव वसुदत्ता असें होतें. तिच्याच पोटीं माझा जन्म झाला. बाल्यावस्थेंतच माझे वडील मरण पावलें. माझी आई मोठी कष्टाळू होती. ती रात्रंदिवस मोलमजूरी करी व माझ्या शिक्षणाची काळजी घेई.

एके दिवशीं आमच्या येथे दोन अतिथी विश्रांतीसाठीं उतरले होते. शेजारच्या आश्रमांत मृदंग वाजत होता. मृदंग वाजविणारा गृहस्थ माझ्या वडिलांचा परम मित्र होता. आईला वडिलांचे स्मरण होऊन ती म्हणाली,

'हा बघ नंद नाचत आहे. तो तुझ्या वडिलांचा परम मित्र होता.'

'आई, तुझी आज्ञा असल्यास मी त्याच्या घरीं जातो, तो कसा नाचतो ते पहातो नि परत येऊन तुला सर्व जसेंच्या तसें, अगदी तो करतो तसें, नाचगाणें करून दाखवितो.'

मी जे कांहीं आईला सांगितले ते ऐकून घरीं आलेल्या त्या दोन अतिथींना आश्चर्य वाटलें; मी एक थापाड्या विदूषक आहे अशा दृष्टीनें ते मजकडे पाहूं लागले. तेव्हां माझी आई त्यांना म्हणाली,

'महाराज, क्षमा करा ! हा जे कांहीं बोलतो ते सत्य आहे. एकदां ऐकलेली किंवा पाहिलेली कोणतीहि गोष्ट हा करून दाखवितो. हा एकपाठी आहे बरं !'

आईचें बोलणें ऐकून त्या अतिथींनी माझी परिक्षा घेण्याचे ठरविलें. त्यांनी प्रतिशाख्य म्हणून दाखविलें आणि लगेच मी ते पुन्हां त्यांना शब्दन् न शब्द म्हणून दाखविले. त्यांची खात्री पटली कीं मी खरोखरच एक पाठी आहे.

ते दोघेही मजबरोबर नंदाचे नृत्य पहाण्यास आले. घरीं परतल्यावर माझ्या आईला ते नृत्य जसेंच्या तसे करून दाखविले. माझ्या एकपाठीपणाबद्दल खात्री होतांच ते माझ्या आईला म्हणाले,

"माते, देवस्वामी आणि करंभक असें दोन भाऊ वेतस नगरांत रहात होते. त्यांचेच आम्हीं मुलगे. बाल्यावस्थेतच आमचे दोघांचे वडील मरण पावले व त्यांच्या दुःखानें आमच्या माताही आम्हांला सोडून परलोकीं गेल्या.

आम्हीं अनाथ झालों. विद्या शिकून विद्वान व्हावें अशी आम्हां दोघांना इच्छा होती. कार्तिकस्वामींना प्रसन्न केल्यास विद्या प्राप्त होइल असें आम्हांला सांगण्यांत आलें. आम्हीं लगेच घोर अरण्याचा रस्ता धरला. आणि कार्तिकस्वामींना प्रसन्न करण्यासाठीं तप करण्यास सुरवात केली. अतिशय खडतर तपश्चर्येनंतर कार्तिकस्वामी एकदां आमच्या स्वप्नांत आले नि दृष्टांत दिला,

'मुलानों, वर्ष नांवानें संबोधिला जाणारा एक ब्राह्मण पाटलीपुत्र नामक नगरांत रहात आहे. त्याच्याकडे तुम्हीं जा. तो तुम्हांला सर्व विद्या शिकवील.'

कार्तिकस्वामींच्या आज्ञेप्रमाणें आम्हीं पाटलीपुत्राला गेलों. वर्ष कोठें रहातो म्हणून सर्वत्र तपास सुरूं केला. वर्ष ब्राह्मणाचें नांव काढतांच लोक हसूं लागत. जणूं त्यांना म्हणावयाचें होतें कीं एका मुर्खाला शोधण्यासाठीं हे दोन महामूर्ख निघाले आहेत. कारण वर्ष हा एक मूर्ख ब्राह्मण आहे असेंच सर्व लोकांचे मत पडलें. आम्हांला मोठा विचार पडला. कार्तिकस्वामी अशा मूर्खाकडे जा असें आम्हांला कसें सांगतील? शक्य नाहीं. स्वप्नावर विश्वास ठेऊन आम्हीं वर्ष ब्राह्मणाच्या घरी पोंचलो. त्याचे घर म्हणजे एक पडीक धर्मशाळा वाटली. सर्व भिंती कोसळल्या होत्या. जमिनीवर अनंत वारूळें आणि उंदरांची बिळें दिसत होती. आणि तशाच त्या जागीं वर्ष ध्यानस्थ बसला होता. आंत पाऊल टाकतांच वर्षाची पत्नी पुढें आली. हाडांचा सापळा झालेली, फाटकीं वस्त्रें परिधान केलेली ती वर्ष स्त्री पाहून लोक सांगतात तेंच बरोबर आहे असा विचार आमच्या मनांत येऊन पाठमोरे होऊन पुन्हां तपश्चर्येला जावें असा विचार आमच्या मनांत येतो न येतो तोंच वर्ष स्त्रीनें आम्हांला नमस्कार केला व येण्याचें कारण विचारलें. आम्हीं आमचा सर्व वृत्तांत

तिला सांगितला. तिच्या हृदयांत आमच्या बद्दल वात्सल्य प्रेम निर्माण होऊन तीनें तिचा सर्व वृत्तांत आम्हांला कथन केला तो असा :—

# वर्ष व उपवर्ष

ह्यांच्या वडिलांचे नांव शंकरस्वामी. त्यांना दोन अपत्यें होती. माझे पति हे थोरले व धाकटा उपवर्ष. उपवर्ष अतिशय हुषार व संपन्न होता. त्याच्या अगदी उलट म्हणजे माझे ध्यानस्थ बसलेले पतिराज ! थंडीची व उन्हाची बाधा होऊं नये म्हणून ह्या देशांत एक विचित्र व्रत करण्याची प्रथा पडली आहे. गूळ आणि कणिक मिसळून त्याचे अनेक तऱ्हेचे लाडू करावयाचें. शहरांत एखादा मूर्ख ब्राम्हण रहात असेल त्याला ते लाडू व दक्षिणा द्यावयाची. असें केले म्हणजे थंडी व उन्ह बाधत नाहीं असा येथील लोकांचा समज आहे.

एकदां माझ्या जाऊबाईनेंहि हे व्रत केले. आणि दान देण्यासाठीं निवड केली ती माझ्या पतिदेवांची. मला हा सर्व वृत्तांत समजतांच मी ह्यांना वाटेल तसें टाकून बोललें. मूर्ख म्हणवून घेण्यापेक्षां मरण पत्करलें, स्वाभिमानानें जगा... इत्यादि जे तोंडाला येईल ते बडबडले. ह्याचा परिणाम होऊन माझे पति कार्तिकस्वामींच्या उपासनेसाठीं निघून गेले.

अपमानित झालेल्या माझ्या पतिनी एकनिष्ठेनें स्वामींची आराधना केली. घोर तपश्चर्येला लवकरच फळ येऊन कार्तिकस्वामी प्रसन्न झाले. व ह्यांना सर्वविद्यांची प्राप्ती झाली. कार्तिकस्वामींनी आज्ञा दिली आहे कीं, एकपाठा शिष्य शोध व त्याला ह्या सर्व विद्या शिकव. तेव्हांपासून हे एकपाठा शिष्याची मार्गप्रतिक्षा करात

ध्यानस्थ बसले आहेत. म्हणून वत्सानों, तुम्ही एकच गोष्ट करा. शोध करून एखादा एकपाठी आणा म्हणजे तुम्हां सर्वांचे काम होईल.'

त्या साध्वीनें सांगितलेली ही हकिकत ऐकून आम्हांला अतिशय वाईट वाटले. तिला मदत व्हावी म्हणून शंभर सुवर्णमुद्रा दान केल्या व एकपाठीच्या शोधार्थ अहोरात्र ह्या पृथ्वीच्या पाठीवर फिरत आहोंत पण व्यर्थ. योगायोगानें आज तुमच्या आश्रयार्थ आलो आणि ह्या एकपाठी मुलाचें दर्शन झालें. 'माते, तुला एकच विनंती. तुझ्या ह्या लाडक्या मुलाला आमच्या बरोबर पाठव. म्हणजे आम्हां सर्वांना विद्या शिकतां येईल आणि धनार्जन करतां येईल.'

'वत्सानों, ह्याच्या जन्माची कथा ऐका. हा जन्मला तेव्हां मेघांचा प्रचंड गडगडाट झाला आणि आकाशवाणी झाली की, जगांतील एका विद्वान माणसाचा जन्म झाला आहे. हा मुलगा मोठा व्याकरणपटु होईल. जगांतील सर्व उत्तमोत्तम वस्तु ह्याला आवडतील. वर्ष नांवाच्या ब्राह्मणांकडून ह्याला सर्व विद्या प्राप्त होतील. ह्याचें नांव 'वररुची' असें ठेवा.

वर्ष गुरुजींकडून विद्या प्राप्त होतील अशी आकाशवाणी झाली खरी पण हे वर्ष कोठें आहेत ह्याचा कांहीच पत्ता नव्हता. हा जसजसा मोठा होऊं लागला तसतशी माझी चिंता वाढत गेली. ह्याच्या गुरुजींचा पत्ता कसा मिळावा ! तुम्हींच मला ह्या चिंतेतून मुक्त केले आहे. तुमचाच हा एक भाऊ आहे असें समजा, तिघेंहि एकोप्यानें वागा, विद्या संपन्न व्हा आणि आपआपल्या घराण्याचें नांव उज्ज्वल करा !'


आईचें बोलणें म्हणजे आशीर्वाद समजून त्या दोघांही अतिथींच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. त्यांनीं माझ्या मातेला अतिशय

नम्रतेनें वंदन केलें आणि त्यांच्याजवळ जे कांहीं द्रव्य होतें तें सर्व तिच्या स्वाधीन केलें. माझी मुंज झालेली नव्हती. मुंज झाल्याशिवाय वेद पठणाचा अधिकार प्राप्त होणार नाहीं म्हणून व्याडीनें माझी मुंज केली व आईचा निरोप घेऊन आम्ही तिघेही पाटलीपुत्र नगरीकडे निघालो.

वाटेंत हालअपेष्टा सोसीत आम्हीं वर्ष गुरुजींच्या घरीं पोंचलों. आपला एकपाठी शिष्य येत आहे हें माझ्या गुरुजींनी दिव्य दृष्टिनें ताडलें व आम्हाला पुढें बसवून स्वतः उच्चासनावर बसले. त्यांच्या दिव्य व पवित्र वाणींतून ॐ काराचा उच्चार होताच सर्ववेद त्यांच्या हृदयांत उत्पन्न झाले. गुरुजींनी एकदा म्हणावें, मी त्याचा उच्चार करावा कीं व्याडि तो म्हणून दाखवी आणि अशा तऱ्हेनें दोनदां उच्चार होतांच इंद्रदत्त म्हणून दाखवित असे. कारण मी स्वतः एकपाठी होतो, व्यादि द्वीपाठी (म्हणजे दोनदां म्हटल्यावर पाठ होणारा) व इंद्रदत्त त्रिपाठी (इंद्रदत्त त्रिपाठी म्हणजे तिनदां एकल्यावर पाठ होणारा) होता. वर्ष ब्राह्मणाच्या घरी होणारा पवित्र वेदांचा घोष ऐकून वर्षाला मूर्ख म्हणून संबोधणारी सर्व ब्राम्हण मंडळी आश्चर्य चकीत झाली. ते सर्व त्याच्या घरीं आले आणि तेजस्वी वर्षाला त्यांनी सर्वांनी साष्टांग नमस्कार घातला व त्याची स्तुती केली. वर्षगुरुजींचा सर्व ब्रह्मविद्वानांनी केलेला सत्कार पाहून उप-वर्षाचा गर्व नाहींसा झाला. खुद्द नंदराजालाहि अतिशय आनंद झाला. आपल्या नगरांत असा विद्वान ब्राह्मण आहे ह्याचा त्याला अभिमान वाटून त्यानें वर्षगुरुजींचे घर द्रव्यानें भरून टाकलें.



# चंद्रावर स्वारी



आपण जी कथा वाचीत आहांत त्या कथेचा काळ फार पूर्वींचा नाहीं. अगदीं अलिकडचाच आहे. आपल्या भारतखंडांत अगदीं पूर्वेच्या टोंकाला पांच मित्र रहात होते. पांचहि जण चांगले शिकलेले होते. विमान बांधणीच्या कामांत त्यांनी प्राविण्य संपादन केले होते. राजदरबारांतूनहि त्यांचा गौरव झाला होता. आपण कांहींतरी अपूर्व करावें, रशिया अमेरिके प्रमाणें चंद्रावर उड्डाण करावें असें त्यांना वारंवार वाटे. त्यांच्या बैठकी होत तेव्हां ह्याच गोष्टींचा ते खल करीत असत.

अशाच एका बैठकींत त्यांनी निर्णय घेतला कीं बस, कांहींही झाले तरी आपण चंद्र लोकावर जायचेंच. विचार चक्रें फिरूं लागली आणि त्यांनीं पांच जणासाठीं पांच विमानें तयार करण्याचें ठरविलें. सल्लामसलती होऊन विमानांच्या बांधणीला सुरवात झाली. पाहिजे तशी विमानें तयार होण्यास दोन वर्षांचा अवधि लोटला. हजारो रुपये खर्च झाले. परंतु शेवटीं त्यांनी हे काम तडीस नेलेच. उड्डाणासाठीं दिवस मुक्रर केला आणि वसंत पंचमीच्या सुप्रभातीं आमचें हें धाडसी पांच वैमानिक चंद्राच्या दिशेनें आपली विमानें घेऊन निघाले. वायुवेगानें विमानें चंद्राच्या दिशेनें झेंपावत होती. कल्पनेच्या जोरावर यांत्रिक रचना केली होती आणि सर्व यंत्रे बरोबर काम देत होती. वैमानिक खुशींत होते. रशिया अमेरिकेला जे जमले नाहीं ते आपण करणार असा त्यांना आत्मविश्वास वाटूं लागला.

चंद्र जवळ जवळ दिसूं लागला. आकाशांतून इतस्ततः कांहीं तरी उडत आहे, अगदी विमानाला चाटून जात आहे असा भास त्यांना होत होता. असाच एखादा पदार्थ आपल्या विमानांवर आदळला तर संपलेच सारे अशी भीति त्यांना वाटत होती. ते एकमेकांना संदेश देऊन सावध रहाण्याचा इशारा देत विमानांच्या वेगाची गति सारखी वाढवीतच होते.

आतां चंद्रबिंब अगदीं जवळ आले. आमच्या सर्व वैमानिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटलें. चंद्राच्या पाठीवर मोठमोठें डोंगर दिसूं लागले नि पर्वतांच्या पायथ्याला लहान लहान घरें दिसूं लागली. किती सुंदर दृश्य होते तें. चंद्रावर मनुष्यवस्ती आहे तर ! आमचे शास्त्रज्ञ म्हणतात कीं चंद्रावर मानव वस्ती असणें शक्य नाहीं ? मानव जर नाहीं तर चंद्रावर घरें कोणी बांधली ! !

लवकरच आपण चंद्रावर उतरणार आहोंत आणि नंतर सर्व खुलासा आपोआप होईलच. आमचे वैमानिक एकमेकांशी बोलत होते नि चंद्राच्या दिसणाऱ्या भागाचे निरीक्षण करीत होते.

विमानें उतरविण्यास सोयिस्कर जागा कोठें मिळतें कीं काय ह्याची पहाणी आमचे वैमानिक करीत होते. विमानांतून घरें दिसत होती खरी परंतु मनुष्य अगर इतर कोणताहि प्राणी अजून त्यांच्या दृष्टिला पडला नव्हता अगर विमानांचा पाठलागहि होण्याची चिन्हें दिसत नव्हती. खाली उतरण्यास कसलीच भीति नाहीं, धोका नाहीं हे जाणून त्यांनी आपआपलीं विमानें चंद्राच्या रोखानें खाली घेण्यास सुरवात केली. आणि.. ...

चंद्रकांतनें बाकीच्या चार दोस्तांना एकदम संदेश दिला.....

'सावध! पहा चंद्रावर कांहींतरी चमत्कारीक आणि अद्भूत घडत आहे. नीट निरीक्षण करा आणि पुन्हां विमाने वर घ्या!!'

चंद्रशेखर, चंद्रचूड, चंदन आणि चंद्रात्रे ह्यांची भीतिनें गाळण उडाली. चंद्राच्या पृष्ठभागावर दिसणारी घरें आपोआप वर उडूं लागली. जणूं एखाद्या अणू बॉंबचा स्फोट व्हावा नि सबंध शहरच्या शहर आकाशांत फेकले जावे तशीच ती घरें वर उडत होती. घरांत कोणीहि मनुष्य प्राणि दिसत नव्हता. आपला सुगावा लागल्यामुळें तर हे चंद्रलोक आपल्या दिशेनें येत नसतील ना? आपल्याहि पेक्षां ते प्रगत असावेत आणि त्यांची घरेंहि विमानासारखीं असावीत अशी भीति आमच्या पांचहि मित्रांना वाटूं लागली.

चंद्रकांत हा सर्वांत धाडसी होता, त्यानें सर्वांना संदेश देऊन धीर दिला. 'उडणारीं घरें पाहून घाबरूं नका. आपआपल्या विमा-

नांत ज्या लोखंडी साखळ्या आहेत त्या बाहेर फेका, त्यांची एक-सांधी साखळी गुंफा नि ह्या उडणाऱ्या घरांना वेढून टाका.'

संदेश मिळतांच विमानांतून सांखळ्या फेकल्या गेल्या, त्यांची एक सांधी सांखळी बनविण्यांत आली नि आमचे वैमानिक वर्तुळाकार व्यूह रचून घरांच्या भोंवती गोल गोल फिरूं लागले. चंद्रकांतची युक्ति सफल झाली होती. उडणारी चारहि घरें साखळीच्या दंडांत ओवली गेली नि आमचे पांच धाडसी वैमानिक निर्जल्या प्रमाणें चंद्रलोकावर उतरतें झाले.

घरांत काय आहे ह्याची तपासणी सुरूं झाली. कसून पहाणी करण्यांत आली परंतु घरें रिकामीं असल्याचे दिसूं लागले. मग ही हवेंत कशी उडत असावीत बरे! ह्यांना गति देणारी शक्ति अदृष्य रूपाने तर घरांत नाहीं ना? अशी शंका येऊं लागली नि त्यांच्या सर्वांगावर भीतिचे रोमांच उभे राहीले. इतक्यांत चंद्रशेखर दुसऱ्या एका घरांतून ओरडत बाहेर आला. त्याचे सर्वांग थरथर कांपत होतें. भीतिनें त्याची जीभ कोरडी पडली होती, तो अर्धवट बोलत होता,

'त्या......त्या. ....घ... ..रांत......' 'अरे पण इतका भीतोस कां? आम्हीं आहोंत ना तुझ्या मदतीला. काय झाले ते तरी नीट सांग' आम्हीं त्याला धीर दिला, घट्ट पकडून धरले नि ब्रँडीचा एक पेला त्याच्या घशांत रिकामा केला. आतां त्याची भीति नाहीशी झाली. तो सांगू लागला.....

'त्या घराचा मी कानाकोपरा तपासत होतो. एका हातांत पिस्तूल आणि दुसऱ्या हातात बॅटरी घेऊन मी फिरत होतो. एका कोपऱ्यांत एक पाईपसारखे लांब नाक असलेला, घुमडासारखे

चकचकीत डोळे असलेला, सशासारखे कान असलेला नि हत्तीच्या सोंडेसारखे तोंड असलेला एक विचित्र प्राणी बसलेला आढळला. त्याचे हात म्हणजे सिंहाचा पंजाच. माझ्या हातांतले पिस्तूल आपोआप गळालें नि मी बाहेर धूम ठोकली.'

चंद्रशेखरनें केलेले वर्णन ऐकून आमचे इतर चारहि वैमानिक प्रथम हबकलेच. परंतु त्यांनी स्वतः होऊन मृत्यूच्या तोंडांत उडी घेतली होती. तेव्हां माघार हा शब्द त्यांच्या कोशांत नव्हताच. आपआपली शस्त्रें परजली नि चंद्रकांतच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी त्या घरांत प्रवेश केला.

घरात पाऊल टाकतांच शिताभीतें चंद्रकांतनें त्या प्राण्याच्या मानगुटीवर उडी घेतली नि हातांतील जंबिया त्याच्या छातिवर रोखला. इतक्यांत तो प्राणि बोलूं लागला,

'अहो पृथ्वीवरील लोकांनो! मला मारूं नका. मला तुमच्या मदतिची जरूरी आहे. माझें नांव चंद्र!'

'चंद्र! म्हणजे ज्याच्या पाठीवर आम्हीं उतरलो आहोंत तो तूंच काय?'

'नाहीं महाराज. मी ह्या येथील प्रदेशाचा राजा आहे. माझी पत्नी अतिशय सुंदर आहे. परंतु ह्या प्रदेशाच्या अतिदूरवर दुसऱ्या एका ग्रहावर राहू आणि केतू हे बलाढ्य राक्षस राहातात. त्यांच्या दृष्टिस माझी पत्नी पडली नि त्या दांडगटांनी तिला पळवून नेले. माझ्या राज्याची धुळधाण केली!'

'म्हणजे ही जी रीकामीं घरें आहेत ती हवेंत उडवीत होतास तो तूंच काय?'

'नाहीं, नाहीं! माझी पत्नी हट्ट धरून बसली होती कीं मला आत्तांच्या आतां माझ्या चंद्रराजाकडें पोंचवा! तेव्हां ते दोघे

दांडगट तिला येथें घेऊन आले आणि तिच्या समक्ष मला ह्या घरांत कोंडून घरें आकाशांत उडवून दिली त्या दोघांनी !'

'अस्सं, अस्सं ! म्हणजे ते इतके शक्तिमान आहेत तर ?'

'ते मोठे जादूगार आहेत. जादूच्या जोरावर ते अदृष्य व्यक्ति निर्माण करतात ! आणि त्या अदृष्य व्यक्ति सावली प्रमाणें माझ्या भोवति फिरत आहेत !'

चंद्राचें सर्व अंग थरथरत होतें. त्याच्या भोवति कांहीतरी सारखें फिरत आहे. त्याची मान आवळण्याचा प्रयत्न होत आहे असें त्याला वाटत होतें. आमच्या वैमानिकांनी त्याला धीर दिला.

'भिऊं नकोस. आम्हीं तुझ्या शत्रूंचा समाचार घेऊं नि तुझें राज्य व तुझी आवडती पत्नी तुला पुन्हां मिळवून देऊं.'

चंद्राचा चेहरा प्रफुल्लीत झाला. तो टुणटुण नाचूं लागला. आपली लाडकी पत्नी पुन्हां आपल्या जवळ येणार ह्याचा त्याला आनंद झाला होता. भावी सुखाचे दिवस त्याच्या डोळ्यापुढून सरकत होते.

'अच्छा ! दोस्त. चल तुझे शत्रू कोठें रहातात ते आम्हांला दाखव. आमची विमाने तयार आहेत.'

अपूर्ण

पुढील चमत्कृति जन्म कथा

**पुढील पुष्प नंबर २ च्या**

पुस्तकांत वाचा.

# संत ज्ञानदेव

ज्या अवतारी पुरुषानें वयाच्या केवळ अठराव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहीली, ज्याच्या रसाळ वाणीनें अवघा देश मंत्रमुग्ध झाला, भगवान् विष्णूचा अकरावा अवतार म्हणून ज्याचा महाराष्ट्रानें गौरव केला त्या महापुरुषाचे अल्पचरित्र.

ज्ञानदेव, निवृत्ति, सोपान आणि मुक्ताबाई हीं चार भावंडे. ह्या सर्व भावंडांना आपण अवतारी व्यक्ति मानतो. ज्ञानेश्वर महाराज हे मराठी भाषेचे जसें श्रेष्ठ कवि तसेंच ते वारकरी पंथाचे प्रमुख आचार्यही. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम ही वारकरी संप्रदायाची परंपरा आहे.

ज्ञानदेव महाराजांचा जन्म आळंदीस झाला. त्यांच्या वडिलांचे नांव विठ्ठलपंत. विठ्ठलपंतांनी संन्यास स्विकारून पुन्हां गृहस्थाश्रमांत प्रवेश केला होता म्हणून ह्या सर्व मुलांना संन्याशाची मुले असे म्हणत असत. ह्या सर्व मुलांचा कर्मठ ब्राह्मणांनी भयंकर छळ केला. विठ्ठलपंत हे स्वभावानें अतिशय भोळे होते. त्यांनी हा सर्व छळ अगदीं निमूटपणें सोसला. मुलें वाढूं लागली, त्यांच्या मुंजीची वेळ जवळ येऊं लागली तशी विठ्ठलपंतांना चिंता वाटूं लागली. संन्याशाच्या मुलांची मुंज करण्यास ब्राह्मणवर्ग परवानगी देणार नाहीं हे पंताना माहीत होते. शेवटी ह्या भोळ्या गरीब पंतानीं ब्राह्मणांना विनंती केली कीं,

'तुम्हीं सांगाल ते प्रायश्चित्त घेतो, परंतु माझ्या मुलांच्या मुंजीच्या आड येऊं नका.'

पंतांच्या ह्या विनंतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. स्वतःला धर्मपालक म्हणविणाऱ्या परंतु वृत्तीनें खाटीक असलेल्या ह्या ब्राह्मणांनीं सर्व शास्त्राची उलथापालथ करून निर्णय दिला कीं,

'विठ्ठलपंतांच्या अपराधास शास्त्रांत प्रायश्चित्त देण्यास आधार सांपडत नाहीं सबब शास्त्राधारें मुलांच्या मुंजी होऊं शकत नाहींत. आणि पंतांच्या अपराधास देहांत प्रायश्चित्ताशिवाय दुसरा उपाय नाहीं.'

केवढी ही कठोर शिक्षा!! परंतु बिचारे विठ्ठलपंत ही शिक्षा भोगण्यास तयार झाले. आपल्या लाडक्या मुलांच्या मोहाचे पाश तोडून ते आपल्या प्रिय पत्निसह देहांत करण्यास सिद्ध झाले. ते सरळ प्रयागला गेले आणि ह्या निरपराध धर्मपरायण, सच्छिल दांपत्यानें गंगायमुना संगमात आपल्या देहाचें विसर्जन केलें.

धर्मसंरक्षणाच्या सबबीवर एका सदाचार संपन्न दांपत्याचा ह्या तथाकथित धर्ममार्तंडांनीं बळी तर घेतलाच पण बिचारी ती चार पाडसें! जी त्यांच्या मागें राहिलीं, त्यांनी काय अपराध केला होता? परंतु ह्या पाषाण हृदयीं धर्ममार्तंडांना त्याचे काय?

ही चारी बालकें अगदीं कोमल वयांत निराधार झाली. दुर्दैव त्यांच्या पाठिशी हात धुऊन लागलें होतें. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई आईवडिलांच्या वियोगानंतर आपेगांवात—आपल्या पूर्वजांच्या गांवीं रहाण्यास गेली परंतु तेथेंही त्यांचे भाऊबंद आडवे आले. त्यांना घरांत घेतले गेले नाहीं व मिळकतीचा वाटाही दिला नाहीं. अशा असहाय्य अवस्थेंतहि ही भांवडें डगमगली नाहींत. निवृत्ति व ज्ञानदेव हे भिक्षा गोळा करण्यास बाहेर पडत आणि सोपानदेव लहानग्या मुक्तास संभाळीत राही.

किती हें असामान्य धैर्य आणि काय हे खडतर दैव ! ! निवृत्ति-नाथ जेमतेम १० वर्षांचे, ज्ञानेश्वर आठव्या वर्षाच्या आसपास, सोपानदेव सात वर्षांचें आणि आणि मुक्ता चार वर्षांची ! सर्वच बालकें, अगदीं कोमल ! !

लहानगी भावंडे आईबापांची आठवण होऊन रडत, गडबडा लोळत. बिचारे निवृत्ति—ज्ञानदेव त्यांची साश्रु नयनांनी समजूत घालीत. ह्या कोमल बालकांची ही पाषाणालाही पाझर फोडणारी करुणास्पद स्थिती पाहून आमच्या त्या कालांतील एकाहि बंधुच्या अगर गृहिणीच्या हृदयाला कसा पाझर फुटला नाहीं ह्याचे आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाही. केवढी ही कठोरता आणि तिही केवळ धर्माच्या अंधश्रद्धेपायीं. आईवडिलांच्या मृत्यूचे चित्र सदैव त्यांच्या डोळ्यांसमोर होते परंतु सभोवति पडलेल्या अंधश्रद्धाळू ब्राह्मणांकडून आपल्या मुंजी होऊं शकत नाहींत हे कटू सत्य त्यांना भेडसावीत होते ! ते अगदीं उदासीन होऊन वागत होते.

ज्ञानदेवांनी मात्र हिम्मत सोडली नव्हती. त्यांनी आपल्या वडिलबंधूस आग्रह केला कीं आपण पैठण येथें जाऊं या. ही सर्व बालमंडळी पैठण मुक्कामीं गेली तथेंहि विद्वान समजल्या जाणाऱ्या ब्राह्मणवर्गानें त्यांचा धिक्कार केला. त्यांना शुद्धिपत्र देण्यास नकार दिला. त्यांची कठोर शब्दांत हेटाळणी केली.

परंतु ज्ञानदेव हे अवतारी पुरुष होते. त्यांच्यापुढे ह्या तथाकथित धर्ममार्तंडांचा काय पाडाव ? ज्ञानदेवांनी आपल्या अलौकिक सामर्थ्यानें रेड्याच्या तोंडून वेद वदविले. रेड्यासारखा मुका प्राणि बोलूं लागला आणि ते बोलणें सुद्धां साधेसुधें नव्हें तर ज्याचा मक्ता ह्या ब्राह्मणवर्गाकडे होता ते वेदमंत्र ! ! सर्व विद्वान मंडळी बावळटा-सारखी रेड्याकडे पाहूं लागली, त्यांच्या माना शरमेने खाली

झाल्या. नाईलाजानें त्यांनी ज्ञानदेवादि चारी भावंडांचा जयजय केला व त्यांना शुद्धिपत्र दिले.

त्यानंतर ह्या भावंडांचा प्रवास सुरुं झाला. नेवासें मुकामी ए पतिव्रता स्त्रीच्या मृतपतीस ज्ञानेश्वरांनी आपल्या करस्पर्शानें जीवं केले. चांगदेवाचा गर्वहरण करण्यासाठीं निर्जीव भींत चालवू दाखविली. चांगदेव महाराज मोठ्या ऐटीनें वाघावर स्वार झा होते. हातांत सर्पाचा चाबूक होता. त्यांना वाटत होतें की ज्ञानेश्व म्हणजे काय एक चिमुकला पोर आणि तोहि संन्याशाचा! पण जेव्हां ज्ञानेश्वर भिंतीवर स्वार होऊन त्यांना सामोरे गेले तेव्हां ह्या गर्विष्ठ मुनीचा सगळा अहंकार नष्ट झाला. ज्ञानेश्वरांनीं पुष्कळ अलौकिक चमत्कार केले परंतु त्या सर्वांची नोंद ह्या अल्पशा चरित्रांत देतां येत नाहीं.

ह्या लोकोत्तर महापुरुषानें अवघ्या सोळाव्या वर्षी जिवंत समाधि घेतली. ज्ञानदेवांनी समाधि घेतांच निवृत्तिनाथ अतिशय कष्टि झाले. त्यांना दुःखावेग आवरता आला नाहीं. सोपान मुक्ताबाईंना दुःख अनावर झाले.

'आम्हा मातापिता नित्य ज्ञानेश्वर।
नाहीं आता भार विश्रांतिसी।'

असें म्हणून ती दोघं स्फुंदुनस्फुंदुन रडूं लागली. काय हें दुर्दैव. मातापित्याच्या दुःखद वियोगानंतर ज्ञानदेवासारखा थोर भाऊ ज्याने अखिल जगताला प्रकाश दिला तो समाधि घेतो! ही दुःखी कष्टी भावंडे आपल्या पूर्वजांच्या जन्मभूमिचे दर्शन घेण्यासाठीं आपेगांवला गेली. पुढें थोड्याच दिवसांनी ह्या तिनही भावंडांनी आपली इहलोक यात्रा पूरी केली.

२१७६५ ३३०१